महामंडलेश्वर

**स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे**

**सत्संग - प्रवचन**

# पाप निवृत्ती उपाय



***(प्रथम आवृत्ती)***


- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दूरध्वनी :

किंमत : पाच रुपये (५/-)


## निवेदन

या जगात कुणी सुखी तर कुणी दुःखी अशी विषमता नेहमी दिसून येते. या विषयमतेचे कारण काय ? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो.

ज्ञानी सांगतात की, या विषमतेचे पाप आणि पुण्य हे एक प्रमुख कारण आहे. पापामुळे दुःखची तर पुण्यामुळे सुखाची प्राप्ती होते. एवढेच नव्हे तर, पापामुळे दुर्गती व पुण्यामुळे सद्‌गती प्राप्त होते.

म्हणून या जगात सुख व परलोकात सद्‌गती हवी असेल तर त्यासाठी पुण्यकर्म तर केलेच पाहिजे. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीवनात पाप करणे बंद करून पापाचा नाश केला पाहिजे, जेने करून जीवनात सुख समाधान शांतता प्राप्त होईल.

पापाचा नाश कसा करावा हे जानण्यासाठी **श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज** यांच्या सानिध्यात जरूर अनुष्ठान केले पाहिजे. तसेच अनुष्ठान काळातील पाप निवृत्ती उपाय हे सत्संग प्रवचन जरूर श्रवण केले पाहिजे. तसा योग आपणास नाहीच मिळू शकला तरी साधकांच्या हितासाठी **'' पाप निवृत्ती उपाय ''** हे सत्संग-प्रवचन लिखित स्वरुपात आपल्या हातात देतांना आम्हास आनंद होत आहे.

**प्रकाशक**

**पाप निकालीए खोजकर वृश्चिक सर्प समान ।**
**मन मंदिर शुद्ध किजीए तब प्रगटे भगवान ।।**

◆ ◆ ◆ ◆ ◆

ज्ञानी महापुरुष असे सांगतात की, शोधून शोधून जसे साप किंवा विंचू घरातून काढतात त्या प्रमाणे मनातून पाप काढले पाहिजे. त्यामुळे जे मन पापाने मलिन झालेले असते ते मन मंदिर शुद्ध होते. मन मंदिर शुद्ध झाल्यामुळे भगवंत प्रगट होतो. असे सांगितल्या नंतर काहींच्या मनामध्ये शंका निर्माण होऊ शकते की, भगवंत प्रगट झाल्यामुळे काय होते? किंवा भगवंत का प्रगट झाला पाहिजे? याचे उत्तर हेच सांगता येईल की, भगवंत जोपर्यंत प्रगट होत नाही, दिसत नाही, भगवंताची काही अनुभूती येत नाही. तोपर्यंत भगवंताची प्राप्ती करून घेता येणार नाही. जोपर्यंत भगवंताची प्राप्ती होत नाही, तोपर्यंत या जगामध्ये सुख, समाधानाची प्राप्ती व मृत्यूनंतर सद्गती प्राप्त होऊ शकत नाही. कारण अनेक संतांचा भक्तांचा जो अनुभव आहे तो तुकाराम महाराजांनी सांगितला की....

**आपुला तो एक देव करूनी घ्यावा ।**
**तेणे विन जीवा सुख नाही ।।**

अनेक रूपाने व नामाने नटलेला जो एक परमात्मा आहे. त्याची प्राप्ती जोपर्यंत होऊ शकत नाही. तोपर्यंत इतर काहीही आणि कितीही प्रयास करा. या जगात सुख समाधान व परलोकात सद्गती प्राप्त होऊ शकत नाही. जसे कौरवांनी एका भगवंताची भक्ती न करता, इतर सर्व उपाय सुखा-समाधानासाठी केले. खूप मोठे छळ,



बळ, कपट केले तरी परंतु ते सुखी होऊ शकले नाही. म्हणून या जगात सुख समाधान व परलोकात सद्गती मिळण्यासाठी भगवंताची प्राप्ती करून घेतली पाहिजे.

भगवंताची प्राप्ती करून घ्यायची असेल तर त्यासाठी नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, भगवंताची प्राप्ती पापी व्यक्ती कधी करून घेऊ शकत नाही. भगवंताची प्राप्ती तर काय परंतु भगवंताच्या प्राप्तीसाठी पापी कधी चुकून देखील प्रयास करू शकत नाही. भगवंताच्या प्राप्तीसाठी कोण प्रयास करू शकतो? तर तुकाराम महाराज म्हणतात...

**देवासाठी जाना तयासीच आटी ।**
**असेल ज्या गाठी पुण्यरासी ।।**

देवासाठी म्हणजेच भगवंतासाठी तोच अट्टाहास प्रयास करू शकतो की, ज्याच्या जवळ पुण्याची रासही रास असेल. ज्याच्या जवळ पुण्य नसेल, पाप असेल तर तो भगवंताची प्राप्ती करून घेऊ शकत नाही. जसे अंधार आणि प्रकाश दोन्ही एकत्र राहत नाही. त्याच प्रमाणे पाप आणि पुण्य दोन्ही एकत्र राहत नाही. म्हणून भगवंताच्या प्राप्तासाठी पुण्य असले पाहिजे पाप नसावे. म्हणजेच पाप नसावे, असे वाटत असेल तर त्यासाठी पाप काढून टाकले पाहिजे. पापाचा नाश केला पाहिजे. पाप काढून टाकायचे, पापाचा नाश करायचा म्हणजे नेमके काय करायचे हे जाणून घेतले पाहिजे. जसे सांगितले." पाप निकालीए खोजकर वृश्चिक सर्प समान " जसे साप आणि विंचू त्रास देतात. विषारी साप चावल्यानंतर मृत्यू होतो. विंचवाने डंख मारल्यानंतर वेदना

होतात. साप चावल्यानंतर एकदाच मृत्यू होतो. विंचवाने डंख मारल्यानंतर जास्तीत जास्त चोवीस तास वेदना राहतात. परंतु पापामुळे तर जीव जन्म आणि मृत्यूच्या चक्रात नेहमी भ्रमण करत राहतो. आयुष्यभर दुःख ही दुःख भोगत राहतो. म्हणून पाप काढून टाकले पाहिजे. साप आणि विंचू जसे काही व्यक्ती पकडीत धरून घराच्या बाहेर काढून टाकतात. तसे पाप तर पकडीत धरून मनाच्या बाहेर काढता येत नाही. तर मग पाप काढायचे कसे? पापाचा नाश करायचा कसा? तर त्यासाठी ज्ञानी महापुरुष सांगतात...

**दुष्कर्म को स्मरिए करिए पश्चाताप ।**
**अश्रूधारा जब बहे बह जाए सब पाप ।।**

सर्वात पहिले कायेने वाचेने मनाने पाप कर्माचा त्याग केला पाहिजे त्यानंतर जे दुष्कर्म आपल्याकडून घडून गेले असेल त्या दुष्कर्माबद्दल पाप कर्मा बद्दल पश्चाताप निर्माण झाला पाहिजे. जसे की, जे खाऊ नये ते आपण खात असेल, पिऊ नये ते प्याले असेल बोलू नये ते बोलले असेल करू नये ते कर्म केले असेल अशा प्रकारे जे कार्य शास्त्राने निषीद्ध मानले असेल असे निषीद्ध किंवा निंद्य कर्म कायेने, वाचेने, मनाने केल्या गेले असेल तर त्या बद्दल पश्चाताप निर्माण झाला पाहिजे. असा पश्चाताप की, डोळयामध्ये, पश्चातापाचे दुःखाश्रू आले पाहिजे. असे पश्चातापाने ज्या वेळेस डोळयातून आश्रू वाहतात त्या वेळेस लहान लहान पापे वाहून जातात, निघून जातात, निवृत्त होतात. जसे की, नदी नाल्यांना पूर म्हणजेच पाणी आल्यानंतर लहान काडी, कचरा, लाकडे वाहून जातात. परंतु मोठे लाकडे मात्र तसेच राहतात. शिल्लक राहिलेले वाहून न गेलेले लाकडे जसे



जाळल्यानंतर नाश पावतात. त्याच प्रमाणे मोठ्या पापांचा जाळून नाश केला पाहिजे. मोठ्या पापांचा नाश कसा करावयाचा? त्यांना कसे जाळायचे? तर ज्ञानी सांगतात.

**चुन चुन किजीए सुकर्म को प्रभू की भेट चढाय ।**
**जप तप संगम ध्यान से दे दुष्कर्म जलाय ।।**

शोधून शोधून सत्कर्म केले पाहिजे. जसे आई, वडील, गुरूजन, साधूसंत यांची सेवा, परोपकार, दान, धर्माचे पालन, इत्यादी ज्याला शास्त्राने सत्कर्म मानलेले आहे. असे कर्म केले पाहिजे. कर्म केल्यानंतर ते सत्कर्म भगवंताला अर्पण केले पाहिजे. जसे काही पुण्यात्मा सत्कर्म करतात व ते सत्कर्म केल्यानंतर " शिवार्पन कृष्णार्पन " म्हणतात. हे म्हणण्याचा त्याचा भाव हा असतो की, हे सर्व कर्म म्हणजेच सत्कर्माचे फळ आम्ही भगवंताला अर्पण करीत आहोत. जसे अनुष्ठान करतात ते शेवटच्या दिवसी अनुष्ठानाचे फळ भगवंताला अर्पण करतात. हे ऐकल्यानंतर काहींच्या मनात शंका निर्माण होऊ शकते की, महत्प्रयासाने जे सत्कर्म आम्ही केले त्याचे फळ जर भगवंताला अर्पण केले तर ते सत्कर्म, पुण्यकर्म करण्याचा आम्हाला लाभ काय? अशी शंका ज्यांच्या मनात निर्माण झाली असेल त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की, सत्कर्माचा कधी नाश होत नाही.

जसे काही व्यक्ती महत्प्रयासाने पैसे कमवतात व बँकेत जमा करतात. बँकेत जमा केलेले पैसे जसे अडचणीच्या वेळेस मिळतात. त्याच प्रमाणे भगवंताला अर्पण केलेले पुण्य संकट समयी आपल्या कामास आल्याशिवाय राहत नाही. म्हणून सत्कर्म

करून भगवंताला ते अर्पण केले पाहिजे. त्याने पुण्याचा उदय होतो, त्याच प्रमाणे मोठे जे पापे असेल तर ते पापे जपाने, तपाने, संयमाने व ध्यानाने जाळून टाकले पाहिजे.

म्हणजेच पापाचा नाश करण्यासाठी सद्‌गुरुच्या मुखाने नाम किंवा मंत्र घेतला पाहिजे. त्या नामा किंवा मंत्राचा नेहमी जप केला पाहिजे. कायिक, वाचिक, मानसिक तप केले पाहिजे. मनावर इंद्रियावर नेहमी संयम ठेवला पाहिजे. रात्रंदिवस नेहमी भगवंताचे ध्यान केले पाहिजे. अशा सत्कर्माने पापाचा नाश केला पाहिजे. मृत्यूच्या पहिले अशा प्रकारे पापाचा नाश नाही केला तर...

**कभी नरक गती मे जाता है । बिज पाप का बोकर ।**
**घोर व्यथाए सब सहता है । दीन नारकी होकर ।।**

पापामुळे जीव नरक गतीला जातो. त्या नरकामध्ये असंख्य यातना भोगतो जसे.....

**छेदन भेदन ताडन फाडन की है अकथ कहानी ।**
**बडे बीलखते सदा नारकी मिले न दाना पाणी ।।**

नरकामधील जीवांचे दुःख वाणीने वर्णन करणे अशक्य आहे. कारण की त्या ठिकाणी जीव महाभयानक दुःख भोगतात जसे..

**तील तील करे देह के खंड । असूर भीडावे दृष्ट प्रचंड ।**
**सिंधू निर ते प्यास न जाय । तो भी एक न बुंद लहाय ।।**

त्या ठिकाणी देहाचे तुकडे तुकडे केले जातात. असंख्य यमदूत यमयातना देतात, समुद्र पिऊन देखील तहान जानार नाही अशी महाभयानक तहान लागते. परंतु पिण्यासाठी मात्र एक थेंब



देखील मिळत नाही.

हे सर्व श्रवण केल्यानंतर काही अश्रद्धाशील कदाचीत म्हणतील की, हे तर आम्ही बघीतले नाही. आम्ही नरक बघितला नाही तेव्हा नरक आहे असे कसे मानावे? याचे उत्तर हेच देता येईल की, नरक आपण भलेही बघितला नसेल परंतु नरक यातनांचे दुःख तर या जगात देखील बघावयास मिळते. बरेच जीव जंतू व व्यक्ती नरकात सांगितलेल्या यातनेपेक्षा, दुःखापेक्षाही या जगात जास्त नरक यातना किंवा दुःख भोगत असतात.

म्हणून अशा नरकयातना आपणास भोगाव्या लागू नये असे वाटत असेल तर त्यासाठी जपाने, तपाने, संयमाने, अनुष्ठानाने ध्यानाने पापाचा नाश केला पाहिजे. अशा प्रकारे पापाचा नाश केला असेल तर नवीन पाप होऊ देता कामा नये. नवीन पाप होऊ नये असे वाटत असेल तर पाप कशामुळे होते. पाप होण्याचे कारण काय हे चांगल्या प्रकारे जाणून घेतले पाहिजे. महापुरुषांनी पापाचे म्हणजेच पाप होण्याचे प्रामुख्याने तिन कारणे सांगितले ते म्हणजे

**पाप के कारण तीन है मोह परवश अभिमान ।**
**मोहसे परवश पाप को मिले अल्पतर जान ।।**

पाप होण्याचे जे तीन कारणे सांगितले ते म्हणजे मोह, परवश आणि अभिमान या तीन कारनामुळे पाप होते. या ठिकाणी पापाचे जे तीन कारणे सांगितले त्यापैकी पहिले कारण म्हणजे मोह म्हणजेच काही पापे मोहामुळे अज्ञानामुळे किंवा आसक्ती मुळे होतात.जसे काही व्यक्ती अज्ञानामुळे मद्य आदि व्यसनाचे सेवन

करतात. त्यामुळे मद्य प्राशनाचे महाभयानक पाप त्यांना लागते. त्यामुळे जिवंतपणीच त्यांची दुर्गती होते. सुरवातीला मोहामुळे किंवा अज्ञानामुळे मद्य प्राशनाचे जे ते पाप करतात. त्याचा एवढा महाभयानक वाईट परिणाम होईल याची त्यांना कल्पना नसते.

दुसरे पापाचे कारण म्हणजे परवश पाप. परवश पाप म्हणजे निर्बल किंवा पराधीन असल्यामुळे जे पाप होते, त्याला परवश पाप असे म्हणतात. शरीराने मनाने जे बलवान असतात, ते शरीराने मनाने निर्बल असणाऱ्याकडून असे पाप करून घेत असतात.'' बळी तो कान पिळी '' असी एक म्हण आहे. या म्हणी प्रमाणे बलवान निर्बलाकडून आपल्या बलाचा दुरूउपयोग करून असे पाप करून घेतात. जसे काही लहान लहान मुले अनुष्ठान करतात. किंवा काही सत्संग प्रवचन श्रवण करतात. त्या वेळेस त्यांनी ऐकलेले असते की व्यसने करने तर महापाप आहेच, परंतु व्यसनाच्या पदार्थांना स्पर्श करने देखील पाप आहे. त्यामुळे घरी गेल्यानंतर व्यसनांच्या पदार्थांना स्पर्श करणे पाप आहे असे त्यांच्या नेहमी लक्षात राहते. त्यामुळे असे सद्‌गुणी मुले व्यसनांच्या पदार्थांना स्पर्श करत नाही. परंतु काही मुलांवर व्यसनाच्या पदार्थांना स्पर्श करण्याची पाळी येते.

कारण त्यांचे वडील व्यसनी असतात. ते अशा सद्‌गुणी मुलांना विड्या, सिगारेट, तंबाखू गुटखा आदि आणण्याकरीता दुकानात पाठवतात. तेव्हा ते मुले ते व्यसनाचे पदार्थ आणण्यासाठी नाकारतात, ते म्हणतात की बाबाजींनी व्यसनांच्या पदार्थांना स्पर्श करणे पाप सांगितलेले आहे. म्हणून व्यसन करू नये, हे ऐकल्यानंतर त्यांचे वडील त्या मुलांचा हा सद्‌उपदेश पाळत तर नाही. उलट मला



शिकवतो? असे म्हणून त्या मुलांना मारतात व जबरदस्ती त्याला व्यसनाचे पदार्थ आनण्यासाठी पाठवतात. मारण्याच्या भयामुळे तो मुलगा व्यसनाच्या पदार्थांना स्पर्श करण्याचे पाप करतो. त्यामुळे त्याला परवश पाप लागते.

ज्या प्रमाणे मुलांना परवश पाप लागते. त्याच प्रमाणे काही स्त्रियांना देखील परवश पाप लागते. जसे ज्या स्त्रियांनी अनुग्रह घेतलेला आहे किंवा ज्या स्त्रियांनी सत्संग-प्रवचनामध्ये ऐकले की, मांसाहार करणे व मांसाहार बनविणे पाप आहे. त्या स्त्रिया मांसाहार बनविणे टाळतात. कारण त्यांनी ऐकलेले असते की, मांस म्हणजेच सागुती. सागुती म्हणजे सहाजणांना पापामध्ये जी गुंतविते. तिला म्हणतात सागुती. अनुमोदन देणारा, मारणारा, घरी आणणारा, शिजवणारा किंवा शिजविणारी, वाढणारा किंवा वाढणारी आणि खाणारा किंवा खाणारी अशा सहा जणांना जी त्या पाप कर्मामध्ये गुंतवून नरकाला नेते ती सागुती आम्ही शिजविणार नाही. असे ज्या वेळेस सद्‌गुणी स्त्रिया म्हणतात तर त्या वेळेस काहींचे पती जे राक्षसी वृत्तीचे असतात ते स्त्रियांना मारतात. व जबरदस्तीने त्यांना बनवायला लावतात. त्यामुळे अशा स्त्रियांना पाप लागते. त्या पापाला परवश पाप म्हणतात. असे परवश पाप देखील आपण टाळले पाहिजे. म्हणजेच आपण परवश पाप देखील करू नये. असे सांगितल्यानंतर काही स्त्रिया कदाचित म्हणतील की, असे पाप टाळण्याचा आम्ही प्रयास केला तर आमचे पती तर राक्षसाच्या वृत्तीचे आहे. ते आम्हाला मारतात. अशा वेळी आम्ही काय करावे? तर ज्ञानी सांगतात. मार सहन केलेला बरा, परंतु

पाप करू नये. कारण पती मारायला लागल्यानंतर कदाचीत कुणीतरी सोडविल. पतीचा मार सहन केल्या जाईल. परंतु यमाच्या त्रासापासून कुणी सोडविणार नाही. व यमाचा मार सहनही केल्या जाणार नाही.यासाठी परवश देखील पाप होऊ देऊ नये. सर्वात मोठे पापाचे कारण असेल तर ते म्हणजे....

**विपूल दोष अभिमान है विद्या धन बल मान ।**
**इसका पाप निवारन दुष्कर काज पहचान ।।**

सर्वात मोठे पाप अभिमानामुळे होते. मग तो अभिमान विद्येचा म्हणजेच पुस्तकी ज्ञानाचा असो की, धनाचा असो. त्याच प्रमाणे अभिमान बळाचा असो की मानसन्माचा असो. अभिमान अधोगतीला कारणीभूत होतो. म्हणून अभिमान चांगला नाही. परंतु या ठिकाणी हेही लक्षात ठेवले पाहिजे की, अभिमान कोनताच चांगला नाही परंतु स्वाभिमान मात्र जरूर असला पाहिजे. जसे काही स्वाभिमानी असतात. ते असे मानतात की आमच्या कुळात पाप कुणी करत नाही. वाईट कर्म करत नाही. अधर्माने वागणे आमच्या कुळाला शोभा दायक नाही. इत्यादी

सांगायचे तात्पर्य हेच की, अभिमान आणि स्वाभिमान वेगवेगळे आहे. काही स्वाभिमान आणि अभिमान यांना समानार्थी शब्द मानतात. स्वाभिमानाने उत्कर्ष तर अभिमानाने अधोगती होते. म्हणून म्हणतात की, '' **विपूल दोष अभिमान है** '' अभिमान्याला महान दोष म्हणजेच महापाप लागते. अभिमानामुळे जे महापाप होते ते महापाप किंवा अभिमान्याचा अभिमान निवृत्त करणे कठीण कार्य आहे. कारण अभिमानी कुणाचेच ऐकत नाही. जसा रावणाला भगवान रामाने व



दुर्योधनाला भगवान श्रीकृष्णाने सद्उपदेश केला. परंतु रावणामध्ये दुर्योधनामध्ये अभिमान असल्यामुळे त्यांनी उपदेश श्रवण केला नाही. त्यामुळे त्यांच्या कुळासह त्यांना मरावे लागले. अभिमानामुळेच त्यांची अधोगती झाली. म्हणून जीवाचा अभिमान व अभिमानामुळे होणारे पाप निवृत्त करणे कठीण कार्य आहे. त्यामुळे सर्वात मोठे पाप अभिमानामुळे होते. व सर्वात अल्प पाप म्हणजे परवश पाप जे भगवंताच्या कृपेमुळे निवृत्त होते. जसे.....

**अल्पदोष पितुमातूसम क्षमा करे भगवान ।**
**जो उपजे अभिमान से कठीण त्याग वह जान ।।**

आई-वडील जसे अज्ञानामुळे झालेले अज्ञानाचे दोष क्षमा करतात. तसे भगवंताची भक्ती केल्यानंतर अल्प दोष भगवंत क्षमा करतात. परंतु अभिमानामुळे जे दोष म्हणजेच पापे होतात. त्याला मात्र कधीच क्षमा होऊ शकत नाही.

म्हणून अभिमानामुळे पापे होऊ देऊ नये. जसे काहींना माहीत असते की, व्यसने करणे, हिंसा करणे, चोरी करणे, खोटे बोलने किंवा खोटी गवाही देणे, पाप आहे. तरी परंतु काय होते व्यसने केल्याने काय होते हिंसा केल्याने अशी अभिमान वृत्ती मनात धारण करुन ते पाप करतात. त्यामुळे ते जिवंतपणी दुःख व मृत्यूनंतर महान नरकाचे दुःख भोगतात. म्हणून अभिमानामुळे असे प्रश्न मनात निर्माण करून पापकर्म करू नये आणि जर पाप कर्म केलेच तर ते भोगल्याशिवाय गत्यंतर नाही. कारण

**जैसे छाया पुरुष संग जहाँ जाए तहाँ जाय ।**
**पाप पुण्य इस जीव के सदा साथ ही पाय ।।**

जसी सावली पुरुषाच्या सोबत राहते, त्याच प्रमाणे पापे देखील जीवाच्या सोबतच राहतात. जीवात्मा जेथे जातो तेथे त्या जीवात्म्या सोबत पापे जातात व त्यालाच दुःख ही दुःख देतात. म्हणून सर्व पापे जिवंतपणीच काढून टाकले पाहिजे. पापे काढण्यासाठी अत्यंत सावधान तत्पर राहिले पाहिजे. जसे आपण साप किंवा विंचू काढण्यासाठी तत्पर राहतो. तसे तत्पर सावधान आपण पापे काढण्यासाठी राहिले पाहिजे.

समजा रात्रीचे बारा वाजले असेल खूप झोप येत असेल अशा वेळेस एखादा साप किंवा विंचू जर आपल्या अथंरुणाकडे आला तर जसे आपण म्हणत नाही की, आता खूप झोप आलेली आहे. त्यामुळे या सापाला किंवा विंचवाला सकाळी काढू. लगेच त्या सापाला किंवा विंचवाला बाहेर काढतो. तसे पापाला लगेच मनातून काढले पाहिजे. काही तर सापाला मारून बाहेर काढतात, त्याला जाळतात व त्या नंतर देखील जेथून बाहेर काढले त्या ठिकाणी उंदराचा जरी आवाज आला तरी सावधान होतात की, दुसरा साप तर आला नाही? तसे पापाबद्दल सावधान राहिले पाहिजे. म्हणजेच जपाने, तपाने, संयमाने, ध्यानाने सर्व पापे जाळून टाकले पाहिजे. व नवीन पापे अभिमानामुळे होऊ देऊ नये याची दक्षता घेतली पाहिजे.

अशा प्रकारे ज्या वेळेस मन निष्पाप होते शुद्ध होते त्या वेळेस संत म्हणतात. ''मन मंदिर शुद्ध किजीए तब प्रगटे भगवान'' मन मंदिरामध्ये भगवंत प्रगट होतो. भगवंत प्रगट झाला की, आनंदही आनंद प्राप्त होतो. दुःखाचे कारण भगवंताची अप्राप्ती हे आहे व सुखाचे आनंदाचे कारण भगवंताची प्राप्ती हेच आहे.



जसे एखादी वस्तू व्यक्ती प्रगट नसल्यामुळे त्यापासून जो लाभ मिळायला पाहिजे तो मिळत नाही. आई व मुलगा बाजारात गेल्यानंतर आई व मुलाची ताटातूट झाल्यानंतर आई व मुलगा दोघेही रडतात, दुःखी होतात. दोघेही बाजारातच असूनही एकमेंकाना न दिसल्यामुळे दोघेही दुःखी राहतात. त्याचप्रमाणे भगवंत आपल्या जवळच म्हणजेच हृदयात असूनही प्रगट नसल्यामुळे जीवाला दुःख होते. आकाशात सूर्य असूनही ढगामुळे प्रगट नसेल झाकला गेला असेल तर जशी उष्णता मिळत नाही. त्याच प्रमाणे भगवंत जवळच असूनही जीवाला आनंद मिळत नाही जीव भगवंताविना दुःखी राहतो.

एक आजीबाई सकाळपासून दुपारपर्यंत परेशान होती, दुःखी होती. कारण तिला चष्मा सापडत नव्हता. चष्मा सापडत नसल्यामुळे चांगले दिसत नव्हते. न दिसल्यामुळे काही सूचत नव्हते त्यामुळे ती म्हातारी आजीबाई दुःखी होती. दुपारी तर ती अत्यंत वैतागून गेली.दुःखाने ती म्हणाली असा कसा दुर्भाग्याचा दिवस उजाडला की चष्मा सापडत नाही. असं कसं माझं कपाळ करंट. असे म्हणत तिने कपाळावर दुःखाने हात मारला.... तेव्हा तिच्या हाताला कपाळावर असलेला चष्मा सापडला व ती आनंदीत झाली.

जसा चष्मा आजीबाईच्या कपाळावरच होता परंतु प्रगट नसल्यामुळे ती दुःखी होती व प्रगट होताच ती आनंदीत झाली. त्याच प्रमाणे हृदयात परमात्मा आहे परंतु जोपर्यंत तो प्रगट होत नाही, तोपर्यंत सुख, समाधान, आनंदाची प्राप्ती होऊच शकत नाही.

हृदयात इतक्या जवळ परमात्मा असूनही का दिसत नाही? तर जसे उथळ म्हणजेच थोडे पाणी असेल परंतु जर ते पाणी गढूळ असेल व पाणी हालत असेल म्हणजेच स्थिर नसेल तर पाण्यात पडलेले मोठे भांडे देखील दिसत नाही. या उलट पाणी खोल असेल स्थिर असेल व स्वच्छ असेल तर छोटीसी वस्तू किंवा पैशाचे नाणे देखील दिसते. कारण पाणी स्वच्छ आहे व स्थिर आहे. त्याच प्रमाणे ज्याचे मन स्वच्छ म्हणजेच शुद्ध म्हणजेच निष्पाप असेल तर त्याला भगवंताची अनुभूती भगवंताची प्राप्ती होते. त्याचे जीवन धन्य होते. त्याच्या जीवनात सुख, समाधानाची प्राप्ती होते.

या भवसागरातून तो तरुण जातो. केवळ तोच तरतो असे नव्हे तर त्याच्या सानिध्याने अनेकांचा तरणोपाय होतो. म्हणून आपन तरूण इतरांना तारायचे असेल तर त्यासाठी आपण निष्पाप झाले पाहिजे. आपणास निष्पाप व्हायचे असेल तर त्यासाठी ब्रह्ममुहूर्तात उठले पाहिजे. आपण तरून जगाला तारण्यासाठी अनेक साधू संत ब्रह्ममुहूर्तात उठतात आणि काय करतात? तर स्नान, संध्या, जप, तप, अनुष्ठान नित्य करतात. भगवंताचे ध्यान पूजापाठ व आरती करतात.



## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळापासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |

⌘ ⌘ ⌘ ⌘ ⌘